दिनांक :    .  .२०१८

प्रति,

-----------

-----------

**विषय : सनातन संस्था आणि हिंदु जनजागृती समिती यांच्यावर खोटे आरोपांद्वारे बदनामी करून होत असलेला अन्याय दूर करण्यासाठी न्यायालयात खटला लवकर चालवावा आणि न्यायालयाचा निकाल येईपर्यंत बंदी मागणी फेटाळावी, यांविषयी...**

महोदय,

सनातन संस्था आणि तिचे साधक गेली दोन दशकांहून अधिक काळ निःस्पृहपणे हिंदु धर्म आणि संस्कृती यांचा प्रचार करून समाजाला अध्यात्म, साधना, संस्कृती आणि राष्ट्र यांविषयी जागृत करत आहेत. तसेच भ्रष्टाचार, जनतेची लुटालूट, अन्याय यांविरोधात वैध मार्गाने लढा देत आहे. त्यामुळे समाज नैतिकता आणि धर्माचरण यांकडे वळून सुख, शांती आणि समृद्ध जीवन यांकडे मार्गक्रमण करत आहे.

गौरी लंकेश हत्येप्रकरणी विविध हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या १८ कार्यकर्त्यांच्या विरोधात पुरवणी आरोपपत्र प्रविष्ट केल्याविषयी अत्यंत हास्यास्पद प्रसिद्धीपत्रक कर्नाटकच्या ‘विशेष अन्वेषण पथका’ने (एस्.आय.टी.ने) प्रसिद्धीस दिले. दाभोलकर हत्या प्रकरणात ‘सीबीआय’ने हिंदु जनजागृती समिती आणि सनातन संस्था यांवर आरोपपत्र दाखल करण्याच्या आधीच आरोप करायला आरंभ केला आहे. तर नुकताच मुंबई एटीएसने नालासोपारा प्रकरणी आरोपपत्रामध्ये आरोपींचा सनातन संस्था आणि हिंदु जनजागृती समिती यांच्याशी संपर्क असल्याचे म्हटले आहे. गेल्या १० वर्षांचा आढावा घेतला, तर काँग्रेस आणि सेक्युलरवाद्यांचे सनातन संस्थेवर बंदी आणण्याचे षड्यंत्र चालू आहे. दाभोलकर-पानसरे-गौरी लंकेश प्रकरणांत अटक झालेले कार्यकर्ते अन्य विविध हिंदुत्वनिष्ठ संघटनांचे असले, तरी सातत्याने मीडियापुढे नाव मात्र सनातन संस्थेचे घेऊन लक्ष्य करण्याचे प्रयत्न स्पष्ट दिसत आहेत. यातूनच षड्यंत्रपूर्वक सनातनला लक्ष्य केले जात आहे, यामध्ये तथ्य आढळते. या संदर्भात अन्य काही सूत्रे पुढे आहोत.

१. ‘सीबीआय’ने अटक केलेल्या आरोपींची कोठडी वाढवण्यासाठीच्या दिलेल्या अर्जात ‘अभ्यासहीन अर्ज कसा करायचा’, याचे चांगले उदाहरण आहे. यामध्ये कलबुर्गींची हत्या ऑगस्ट २०१५ मध्ये झालेली असतांना ती वर्ष २०१६ मध्ये झाल्याचे म्हटले आहे, तर वैद्यकीय अहवालात डॉ. दाभोलकरांच्या छातीत आणि डोक्यात गोळी लागलेली असतांना सचिन अंदुरेने पोटात गोळी मारल्याचे नमूद केले आहे. यातून तपासयंत्रणांचे तपासकाम कसे चालू आहे, हेच दिसून येते. अर्ज इतका सदोष असेल, तर तपास किती सदोष असेल, याची कल्पना करता येईल.

२. केरळ येथून बदलीवर पाठवलेले ‘सीबीआय’चे अधिकारी नंदकुमार नायर यांच्याबाबत केरळ उच्च न्यायालयानेच ‘नायर हे ‘सीबीआय’वरील डाग आहेत’, असे म्हणत त्यांच्यावर कारवाई केली होती. त्यांची कुकृत्ये संस्था आणि समिती यांनी उघड केली आहेत. याचाच राग धरून सूडबुद्धीने ते कारवाई करत आहेत.

३. गौरी लंकेश प्रकरणी मुख्य आरोपी म्हणून ज्या अमोल काळेचे नाव घेतले जात आहे, तो गेली १० वर्षे समितीच्या संपर्कात नव्हता. तो १० वर्षांपूर्वीही समितीचा कोणताही पदाधिकारी नव्हता. तसेच डॉ. दाभोलकर प्रकरणी संशयित म्हणून अटक केलेले डॉ. वीरेंद्रसिंह तावडे हेही समितीच्या कार्यात गेली काही वर्षे सक्रीय नाहीत, तसेच ते असतांनाही त्यांना कोणतेही पद दिलेले नव्हते. तरी देखील ‘सीबीआय’ने आरोपपत्रात त्यांना हिंदु जनजागृती समितीचे ‘उपाध्यक्ष’ असे म्हटलेले आहे. जी पदे समितीच्या कार्यातच नाहीत, ती निर्माण केली जात आहेत आणि सर्व आरोपींना समितीचेच कार्यकर्ते असल्याचे भासवले जात आहे. हे दुसरे तिसरे काही नसून आधीची कारस्थाने फसल्यावर करण्यात येणारा पुढचा प्रयत्न आहे. याआधीही सनातनने अंनिसचा ‘अर्बन नक्षलवाद’ आणि आर्थिक घोटाळे काढले, तेव्हा अंनिस कायद्याला विरोध करण्यासाठी ही बदनामीची खोटी मोहीम आहे, असा छद्मी प्रचार करण्यात आला होता.

४. नालासोपारा येथील गोरक्षक श्री. वैभव राऊत, सातारा येथील श्री. सुधन्वा गोंधळेकर, संभाजीनगर येथील श्री. शरद कळसकर, जालना येथील श्री. श्रीकांत पांगारकर यांना आतंकवादविरोधी पथकाच्या पोलिसांनी अटक करून यांच्या निवासस्थानी काही स्फोटके सापडल्याचे म्हटले आहे. यानंतर श्री. सचिन अंदुरे, श्री. शुभम सुरळे, श्री. अजिंक्य सुरळे, श्री. रोहित रेगे आणि श्री. अविनाश पवार यांनाही अटक करण्यात आली. या अटक करण्यात आलेल्यांपैकी कुणीही सनातन संस्थेचे साधक नसतांना ‘सनातन संस्थेवर बंदी घाला’, अशी बिनबुडाची आणि उथळ मागणी काही राजकीय पक्ष, संघटना, तथाकथित पुरोगामी, मुसलमान नेते आदींकडून केली जात आहे. एखाद्या संघटनेच्या एखाद्या कार्यकर्त्याने एखादा गुन्हा केल्यावर ती संघटना कशी दोषी असू शकते. प्रत्यक्षात येथे तर आरोपींपैकी कोणीच या दोन संघटनांचे नाही. जर असे मानायचे झाले, तर काँग्रेसच्या गुन्हेगार कार्यकर्त्यांमुळे काँग्रेसवर बंदी घालायला हवी, राहुल गांधींना अटक व्हायला हवी किंवा राष्ट्रवादीच्या गुन्हेगार कार्यकर्त्यांमुळे राष्ट्रवादी पक्षावर बंदी आणि शरद पवार यांना अटक करण्याची मागणी व्हायला हवी; मात्र असे होत नाही. मग सनातन आणि समिती यांबाबत असे का ?

५. तपासयंत्रणांनी दबावातूनच वर्ष २०१५ मध्ये समीर गायकवाड यांनी पानसरेंवर गोळी झाडली, म्हणून त्यांना अटक केली. समीर गायकवाडला न्यायालयाने जामीन दिला आहे. आता याच प्रकरणात कोल्हापूर पोलिसांचे विशेष पथक अमोल काळे, भरत कुरणे आणि जळगाव येथून वासुदेव सूर्यवंशी यांना अटक करून त्यांचाही खुनात सहभाग असल्याचे सांगत आहे. प्रत्यक्षात या कुणाचेही नाव अगोदरच्या अन्वेषणात आलेले नव्हते. ‘सीबीआय’ने आधी म्हटले होते, ‘‘सारंग अकोलकर आणि विनय पवार यांनी गोळ्या झाडल्या. आता म्हणत आहे, सचिन अंधुरे आणि शरद कळस्कर यांनी गोळ्या झाडल्या.’’ आता मारेकरी, गोळ्यांच्या जागा आणि खूनांचे कालावधी बदलत आहेत.

६. ठाणे आणि मडगाव (गोवा) यांपैकी कुठल्याही बॉम्बस्फोटातील आरोपपत्रात सनातन संस्थेचे नाव आलेले नाही. उलट पकडलेल्या आरोपींवर लावण्यात आलेले आतंकवादाचे आरोप न्यायालयाने सपशेल फेटाळून लावले आहेत. मडगाव प्रकरणात न्यायालयाने निकालपत्रात म्हटले आहे, ''हा FIR सनातन संस्थेला गोवण्यासाठीच बनवण्यात आला होता.'' आजपर्यंत सनातन संस्थेच्या विरोधात कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही, तसेच संस्थेच्या साधकांवर कोणताही गुन्हा सिद्ध झालेला नाही. राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील तपास यंत्रणांनी केलेल्या चौकशीत सनातनविषयी कुठेही बेकायदेशीर गोष्टी सापडलेल्या नाहीत. संस्था कायदा आणि राज्यघटना यांच्या चौकटीत कार्य करणारी असल्याने तिने बेकायदेशीर कृत्यांचा वेळोवेळी जाहीर निषेध केला आहे.

७. तत्कालीन काँग्रेस शासनाने यापूर्वी वर्ष २०११ मध्ये सनातनवर बंदी घालण्याविषयीचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवला होता; पण त्याच वेळी 'पुराव्याअभावी बंदी घालू शकत नाही', असे सांगून प्रस्ताव फेटाळून लावला होता.

८. मालेगाव स्फोट अन्वेषणाचे प्रकरण हे मोठे षड्यंत्र होते. खोटे आरोपी, खोटे पुरावे, खोटे साक्षीदार, साक्षीदारांचे अपहरण, जाणीवपूर्वक खटला रखडवणे आदी अनेक गैरप्रकार यात झाले आहेत; मात्र यामुळे साध्वी प्रज्ञासिंह, कर्नल पुरोहित यांना खोट्या आरोपाखाली साडे आठ वर्षे कारागृहात रहावे लागले. तोच प्रकार वरील सर्व हिंदुत्वनिष्ठांविषयी होण्याची दाट शक्यता आहे.

९. दाभोलकर-पानसरे कुटुंबीयंनी दाभोलकर आणि पानसरे हत्या प्रकरणाचा खटला न्यायालयाने चालवू नये, यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. यातून यांना खरे आरोपी मिळणे, दोषींना शिक्षा होणे, हे अपेक्षित नाही, तर सनातनच्या निरपराध साधकांना त्रास व्हावा, हाच हेतू स्पष्ट होतो.

१०. नुकताच गौरी लंकेश हत्या प्रकरण आणि नालासोपारा प्रकरण यांचे आरोपपत्र दाखल झाले. यामध्ये

अ. 'सनातन संस्था, हिंदु जनजागृती समिती आणि अन्य संघटनांचे कार्यकर्ते....' असे म्हटले आहे. यातून अन्य संघटनांची नावे न घेता केवळ सनातन आणि समिती यांना लक्ष्य करण्याचे षड्यंत्र दिसते.

आ. सनातन संस्थेच्या 'क्षात्रधर्म साधना' या ग्रंथातील लिखाण वाचून हत्या केल्याचे, तसेच गुन्हे करण्याचा दावा करण्यात आला आहे. एखादा ग्रंथ वाचून हत्या करण्याचा दावा अत्यंत हास्यास्पद आहे. आजवर जिहादी आतंकवाद आणि नक्षलवाद पसरवणारे आतंकवादी कोणता ग्रंथ वाचून हत्या करतात, असे कधीतरी तपासयंत्रणांनी म्हटले आहे काय ? तसे म्हणण्याचे धाडस यंत्रणा दाखवतील काय ? हा ग्रंथ आजवर सहस्रो जणांनी वाचला असून आजवर किती जणांच्या हत्या झाल्या, याची आकडेवारी यंत्रणा देतील काय ?

इ. नालासोपारा प्रकरणात आरोपी वर्ष २०१७ मध्ये 'सनबर्न फेस्टीव्हल'मध्ये बॉम्बस्फोट करणार असल्याची माहिती मिळाल्याचा दावा करण्यात आला आहे. आरोपींना अटक ऑगस्ट २०१८ मध्ये करण्यात आली आणि स्फोट डिसेंबर २०१७ मध्ये करणार होते, मग कोणताही स्फोट न

होता ८ महिन्यांनी या आरोपींना का अटक करण्यात आली ? कि जाणीवपूर्वक काहीही कथानके रचून हिंदुत्ववाद्यांना अडकवले जात आहे ?

ई. गौरी लंकेश किंवा नालासोपारा दोन्ही प्रकरणांत अटक करण्यात आलेल्यांपैकी कोणीही सनातन संस्था आणि हिंदु जनजागृती समिती यांचे पदाधिकारी वा साधक नाहीत, असे वारंवार जाहीर करूनही षड्यंत्रपूर्वक अडकवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

*** तरी या संदर्भात आम्ही मागणी करतो की....**

१. सनातन संस्था आणि हिंदु जनजागृती समिती यांचा कोणत्याही प्रकरणात सहभाग नाही, यासाठी आम्हीच नेहमी मागणी करत आहोत की, न्यायालयात खटले लवकर चालवावेत आणि सत्य समोर आणावे.

२. सनातन संस्था आणि हिंदु जनजागृती समिती यांना लक्ष्य करणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या षड्यंत्राचे सखोल अन्वेषण करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

३. सनातन संस्था आणि हिंदु जनजागृती समिती यांवर बंदी घालण्याविषयी अनाठायी मागण्या होत आहेत. जर अशा प्रकारचा प्रस्ताव शासनाकडे आल्यास तो फेटाळण्यात यावा.

४. सातत्याने खोटी वृत्त देऊन सनातन संस्था, हिंदु जनजागृती समिती, हिंदु गोवंश रक्षा समिती, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, शिवसेना, श्रीराम सेना आदी संघटनांची आणि त्यांच्या कार्यकर्त्यांची प्रसिद्धीमाध्यमांद्वारे नाहक अपकीर्ति केली जात आहे. अशा स्वयंघोषित न्यायाधीशांवर बंधने आणावीत, खोटी वृत्ते देणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी.

५. खटला बारगळवून हिंदुत्ववाद्यांना नाहक तुरुंगवास भोगावा लागत आहे. त्यामुळे या सर्व प्रकरणांची सुनावणी फास्ट ट्रॅक कोर्टात करावी. ज्या अधिकाऱ्यांनी ही सुनावणी जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवण्याचा प्रयत्न केला, त्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी.

आपला विश्वासू,

संपर्क :